7 JUL 2018 महाराष्ट्र टाईम्स
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# क्षमताविकासातून गुणवत्तेचे ध्येय

म. टा. प्रतिनिधी, कोल्हापूर

'शिक्षकांचा क्षमताविकास व विद्यार्थ्यांची गुणवत्तावाढ या एकमेकांशी पूरक असलेल्या संकल्पनांना योग्य प्रशिक्षणाची जोड देणाऱ्या सामंजस्य कराराच्या माध्यमातून शिवाजी विद्यापीठाने एक पाऊल पुढे टाकले आहे. दीड महिन्यांपूर्वी शिवाजी विद्यापीठ व एस. पी. जैन इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट रिसर्च यांच्यातील करारामध्ये अधोरेखित केलेल्या गोष्टींवर येत्या १५ दिवसात प्रत्यक्ष अंमलबजाणीला

## शिवाजी विद्यापीठ व जैन इन्स्टिट्युटमध्ये सामंजस्य करार

सुरूवात होणार आहे. दरम्यान, शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरु डॉ. देवानंद शिंदे व एस. पी. जैन इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट अँड रिसर्चच्या मार्केटिंग विभागाचे डीन आणि प्रोफेसर डॉ. रंजन बॅनर्जी यांच्यात झालेल्या पहिल्या बैठकीत पुढील सहा महिन्याचे नियोजन करण्यात आले.

या सामंजस्य कराराच्या माध्यमातून शिवाजी विद्यापीठांतर्गत सध्या सुरू असलेल्या अभ्यासक्रमाच्या गुणवत्तेमध्ये वाढ करण्यासाठी कार्यशाळा, केस स्टडी लेखन प्रशिक्षण, संशोधन याद्वारे काम होणार आहे. या सामंजस्य कराराअंतर्गत एम.बी.ए अधिविभागामध्ये व्यावसायिक अभ्यासक्रमाच्या सर्व प्राध्यापकांसाठी व विद्यार्थ्यांसाठी फॅकल्टी डेव्हलपमेंट प्रोग्राम, हेल्प इन केस रायटींग, इम्प्रुव्हींग रिसर्च कॅपॅबिलिटी ऑफ फॅकल्टी, कोलॅबोरेटीव्ह पीएच.डी.प्रोग्राम, इम्प्रुव्ह स्टुडंट आउटकम्स् या मुद्यांवर भर देण्यात येणार आहे.



शिवाजी विद्यापीठ व एस. पी. जैन इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट रिसर्च यांच्यातील कराप्रसंगी डॉ. रंजन बॅनर्जी व कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे हस्तांदोलन करताना. मध्यभागी शिक्षणमंत्री विनोद तावडे.

### फॅमिली बिझनेस मॅनेजमेंट

यांचे कौटुंबिक व्यवसाय गेल्या तीन ते चार पिढ्यांपासून सुरू आहेत. या व्यवसायात जेव्हा नवी पिढी येते तेव्हा काहीवेळा दोन पिढ्यांमधील विचारांचा फरक पडतो. त्यातून व्यवसायाची घडी बिघडण्याची शक्यता असते. अशावेळी नव्या पिढीला काळानुरूप बदल करायचे असतात आणि जुन्या पिढीला नवे बदल स्वीकारण्याचा विश्वास नसतो. त्यासाठी या सामंजस्य करारामध्ये फॅमिली बिझनेस मॅनेजमेंट असा अभ्यासक्रम तयार करण्यात आला आहे.

17 JUL 2018

लोकमत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# शिवाजी विद्यापीठात यंदा एम.फिल., पीएच.डी.च्या ११८२ जागा

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठातील विविध अभ्यासक्रमांच्या एम. फिल. आणि पीएच.डी. अभ्यासक्रमाच्या प्रवेशासाठी यावर्षी एकूण ११८२ जागा उपलब्ध आहेत. ऑगस्टच्या पहिल्या आठवड्यात प्रवेश परीक्षा घेण्यात येणार आहे. अर्ज करण्याची प्रक्रिया सुरु झाली असून अंतिम मुदत दि. १९ जुलैपर्यंत आहे.

यावर्षी एम. फिल. विविध २६ अभ्यासक्रमांसाठी २८३, तर पीएच.डी. विविध ४८ अभ्यासक्रमांसाठी ८९९ जागा उपलब्ध आहेत. त्यासाठी दि. ८ ते १० ऑगस्ट या कालावधीत प्रवेश परीक्षा घेण्यात येणार आहे.अर्ज प्रक्रिया ऑनलाईन असून मुदत १५ जुलैपर्यंत आहे. प्रवेश प्रक्रियेची माहिती विद्यापीठाच्या संकेतस्थळावर उपलब्ध आहे. ऑफलाईन पद्धतीने परीक्षा घेण्यात येणार आहे, अशी माहिती कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर यांनी दिली. दरम्यान, यावर्षी पीएच.डी.च्या सर्वाधिक ७८ जागा इंग्रजी विषयासाठी उपलब्ध आहेत. त्यापाठोपाठ रसायनशास्त्र (७४), मराठी (५७), भौतिकशास्त्र (५२), शिक्षणशास्त्र (५१), मेकॅनिकल इंजिनिअरिग (४३), अर्थशास्त्र (४२), हिंदी (४०), प्राणीशास्त्र (३६), वनस्पतीशास्त्र (३०), व्यावसायिक व्यवस्थापन (२९) हे अभ्यासक्रम आहेत. पत्रकारिता, गणित अभ्यासक्रमांसाठी एम. फिल.ची प्रत्येक एक तर, फूड अ‍ॅण्ड सायन्स् अ‍ॅण्ड टेक्नॉलॉजी, पर्यावरणशास्त्र आणि अभियांत्रिकी, फूड टेक्नॉलॉजी अभ्यासक्रमाच्या पीएच.डी.साठी प्रत्येकी एक जागा उपलब्ध आहे.

## एम. फिल.साठी अधिक जागा असणारे अभ्यासक्रम

इंग्रजी (३७), मराठी (२७), रसायनशास्त्र (२३) हिंदी (२२), शिक्षणशास्त्र (१९), वनस्पतीशास्त्र (१८), भौतिकशास्त्र (१७), अर्थशास्त्र (१६)

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
7 JUL 2018
सकाळ

# पर्यटन पदविकेसाठी शिवाजी विद्यापीठात प्रवेश प्रक्रिया

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठातील भूगोल अधिविभागात पर्यटन व प्रवास (डिप्लोमा इन टुरिझम, ट्रॅव्हल) पदविका अभ्यासक्रमासाठी प्रवेश प्रक्रिया सुरू आहे. अभ्यासक्रम एक वर्ष मुदतीचा असून कोणत्याही विद्या शाखेचा पदवीधर प्रवेश घेण्यास पात्र आहे. अभ्यासक्रमाचे शुल्क ११ हजार २७४ रुपये आहे. प्रवेशाची अंतिम मुदत ३१ जुलैपर्यंत आहे. इच्छुकांनी समन्वयक डॉ. डी. एच. पवार यांच्याशी संपर्क साधावा, असे आवाहन केले आहे.